## कवितेचे रसग्रहण

एखादी कविता ऐकल्यानंतर किंवा वाचल्यानंतर मन एका अनामिक आनंदाने भरून जावे, कधी डोळा पाणी यावे, कधी रसाविष्कारात चिंब ओले व्हावे म्हणजे काव्याचा आस्वाद सुरू झाला असे समजावे. कविता वाचताच कधी शब्दांतला ताल रुणझुणायला लागतो, तर कधी कवितेतले शब्द बोलायला लागतात. असं का होतं? तर काव्याचा आस्वाद ही आपली प्रत्येकाची मानसिक भूक असते. जात्यावर गाणे म्हणणारी स्त्री, अंगाई गाणारी आई, हार्मोनियमवर गीत वाजवणारा वादक, काम करता-करता रेडिओवर गाणी ऐकणारा रसिक श्रोता हे आपापल्या आवडीनुसार गाण्याचा, कवितेचा आस्वाद घेत असतात. हा आस्वाद, ही रसिकता चिकित्सक, चोखंदळ असतेच असे नाही. कवितेचा आस्वाद चिकित्सकपणे, चोखंदळपणे, सौंदर्यपूर्ण दृष्टीने घेता यावा, यासाठी 'रसग्रहण' प्रक्रियेचा अभ्यास करावा लागतो.

कवितेतील विचार, भावना, अनुभूती, शब्दयोजना, लय, वृत्त, अलंकार, रस, प्रतिमा, प्रतीके आणि कल्पनाविलास इत्यादी घटकांच्या मांडणीचा आणि त्यामधील सौंदर्याचा आस्वाद घेऊन तो व्यक्त करणे म्हणजे 'रसग्रहण' होय. कवितेत उपरोक्त घटक कमी-जास्त प्रमाणात आढळतात. कधी कधी काही घटक नसतातही. त्यामुळे रसग्रहणाच्या लेखनाचे विशिष्ट नियम सांगता येत नसले तरी रसग्रहणलेखनाचेही एक शास्त्र विकसित झालेले आहे; परंतु तसे तेही काटेकोर नाही. त्यामुळे या शास्त्रालाही कलात्मकतेची जोड आवश्यक ठरते.

काव्यात रसाची महती अनन्यसाधारण आहे. काव्यवाचनाने आणि काव्याभ्यासाने रसिकांच्या मनातील विविध भावनांच्या तारा छेडल्या जातात. उत्कटता वाढीस लागते. तिचे पर्यवसान 'रस' निर्मितीत होते. रसनिर्मिती ही भावनेच्या परिपोषावर अवलंबून असते. मानवी अंत:करण म्हणजे भाव-भावनांचा जणू समुद्रच. ज्या भावना स्थायी, मूलभूत असतात त्यांचा परिपोष झाल्याने रसनिष्पत्ती होते. शृंगार, वीर, करुण, हास्य, भयानक, रौद्र, बीभत्स, अद्‌भुत, शांत असे नऊ रस मानले आहेत. शब्दयोजना, काव्यानुभव, छंद, लय, आघात, प्रतिमा, प्रतीके इत्यादी घटकांतून रसनिर्मिती होते.

वरील विवेचनावरून काव्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

### * काव्याची वैशिष्ट्ये

(१) कवितेत भाषा हे माध्यम असते. अनुभवाची कलात्मक अभिव्यक्ती हा प्रमुख हेतू असतो.

(२) कवितेत अर्थाच्या विविध छटा व्यक्त करणारी आणि सौंदर्यनिर्मिती करणारी शब्दयोजना असते.

(३) कवितेमध्ये रचनाकौशल्याला महत्त्वाचे स्थान असते. छंद, वृत्त यांच्या आधारे वा मुक्तछंदात कविता केली जाते.

(४) तिच्या रचनापद्‌धतीमुळे श्रवणसुभगता आणि स्मरणसुलभता ही गुणवैशिष्ट्ये साधली जातात.

(५) कवितेचे लेखन हे छंद, वृत्त यानुसार असल्यामुळे काही वेळा व्याकरणाचे नियम त्यामध्ये गौण ठरतात.

(६) कवितेत कमीत कमी शब्दांत मोठ्यात मोठा आशय व्यक्त झालेला असतो. (अल्पाक्षरत्व)

(७) शब्दांना नेहमीचा वा नेहमीपेक्षा वेगळा अर्थ प्राप्त करून देणाऱ्या अभिधा, लक्षणा आणि व्यंजना या शब्दशक्तींचा वापर प्रकर्षाने कवितेत असतो.

काही कवितेत विशिष्ट पद्धतीने शब्दरचना केलेली असते. काही कवितांची रचना 'मात्रांनी' सजलेली असते. अशा नाद, लय, वृत्त, छंद, अलंकार इत्यादी घटकांमुळे कवितेची रचना वैशिष्ट्यपूर्ण ठरते. कवितेत आशयानुरूप लय असते. कवितेतील शब्दांना अर्थपूर्ण नाद असतो. या साऱ्या घटकांमुळे कविता हृदयापर्यंत पोहोचते. त्यांतील शब्दच्छटा, अर्थच्छटा यांमुळे कवितेचा गर्भितार्थ मनाला भिडतो आणि रसनिर्मिती होते.

*** अलंकार, प्रतिमा व प्रतीके**

अलंकारांमुळे कवितेला सौंदर्य प्राप्त होते. कवितेतील शब्दांवर, त्यांतील अक्षरांवरील चमत्कृतींवर जे अलंकार आधारलेले असतात त्यांना शब्दालंकार म्हणतात. यमक, अनुप्रास, श्लेष हे शब्दालंकार आहेत. काव्यामध्ये शब्दांच्या अर्थामुळे जेव्हा चमत्कृती उत्पन्न होते, तेव्हा ते अर्थालंकार म्हणून ओळखले जातात. उपमा, रूपक, चेतनगुणोक्ती हे व असे अनेक अर्थालंकार आहेत. कवितेचे रसग्रहण करताना यासंबंधीची उकल महत्त्वाची ठरते.

अलंकारांइतकेच कवितेतील 'प्रतिमा' व 'प्रतीके' हे घटक महत्त्वाचे असतात. 'प्रतिमा' ही काव्याचा एक भाग असते. दोन किंवा अधिक वस्तूंमधील साम्य किंवा वेगळेपण 'प्रतिमेच्या' माध्यमातून दाखवले जाते; तसेच कवितेतील 'प्रतीकांतूनही' वेगवेगळे अर्थ सूचित होतात. हेच खरे तर 'कविता' या साहित्यप्रकाराचे वैशिष्ट्य असते.

*** पाठ्यपुस्तकातील कवितांविषयी**

पाठ्यपुस्तकात वीररसात ओथंबलेली काव्यरचना 'काव्यानंदासाठी' दिलेली आहे. विलक्षण गेयता असलेल्या 'स्वतंत्रतेचें स्तोत्र' या रचनेने पुस्तकाच्या गद्य-पद्य घटकाची सुरुवात होत आहे. 'प्राणसई' ही छंदोबद्ध कविता अष्टाक्षरी छंदातील असून यमक अलंकाराचा प्रत्यय देणारी आहे. 'झाडांच्या मनात जाऊ' ही गेय कविताही यमक अलंकाराने सजली आहे. 'दवांत आलिस भल्या पहाटीं' ही मुक्तछंदातील प्रेमकविता! प्रतिमांचा चपखलपणे केलेला वापर हे या कवितेचे वैशिष्ट्य! 'ऐसीं अक्षरें रसिकें' ही संत ज्ञानेश्वरांची ओवीबद्ध रचना आहे. 'शब्द' ही कविता चेतनगुणोक्ती अलंकाराचे दर्शन घडवणारी आहे. ही रचना मुक्तछंदातील असून सामाजिक विषमतेवर बोट ठेवणारी आहे. 'पैंजण' ही स्त्रीवादी कविताही मुक्तछंदात असून प्रतीकांचा सूचक उपयोग या कवितेत केलेला आहे.

घंटेला दिलेल्या टोल्याने जशा अनेक ध्वनिलहरी निर्माण होतात, तशा काव्यातील शब्दांच्या उच्चाराने विविध भावनांचे तरंग वाचकांच्या मनात आंदोलित होतात. हे तरंग रसनिर्मितीस पोषक ठरतात.

*** रसग्रहण करताना हे लक्षात ठेवा.**

वरील सर्व मुद्द्यांचा अभ्यास केल्यानंतर कवितेचे घटक तुमच्या लक्षात येतीलच. दिलेले मुद्दे लक्षात घेऊन तुम्ही कविता बारकाईने वाचा. कवितेची चाल मधुर असेल, तिच्यातील भावना अंत:करणाला भिडणाऱ्या असतील, तिच्यातील कल्पना चमत्कृतीपूर्ण असतील, कवितेचा भाषिक आकार लहान, रचना सोपी; पण अर्थपूर्ण असेल आणि शब्दांत नादमाधुर्य असेल तर ती कविता थेट हृदयापर्यंत पोहोचते.

रसग्रहण करताना वरील मुद्द्यांसोबत कवितेतील काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घ्याव्यात. कवितेत भावनांची उत्कटता, कल्पनाविलास, विचारसौंदर्य आणि प्रसाद, माधुर्य, ओज हे गुण असतात. कवितेची मध्यवर्ती कल्पना एखाद्या विषयाभोवती गुंफलेली असते. उदा., निसर्गवर्णन, शब्दचित्र, व्यक्तिचित्र, विडंबन, विनोद, उपदेश इत्यादी. कवितेची मध्यवर्ती कल्पना थोडक्यात विशद करून कवितेतील भावना, कल्पना, विचार, सूचकता, नादमाधुर्य, चाल, अलंकार, काव्यगुण, काव्यशक्ती, कवितेचा वाङ्मयप्रकार (आशयानुसार), कवितेचा

रचनाप्रकार, कवितेतील सूचकता, प्रतिमा आणि प्रतीके यांपैकी जे जे गुण आढळतात त्या सगळ्यांची नोंद घेणे किंबहुना वरील गुणांच्या अनुषंगाने कवितेचा सूक्ष्म अभ्यास म्हणजे कवितेचे रसग्रहण होय. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे कवितेतील ओळी तुम्हांला का आवडतात याचे कारण आणि त्या ओळींचा तुमच्या मनावर झालेला परिणाम सांगणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच कवितेचे सौंदर्यदर्शन घेणे म्हणजेच 'रसग्रहण' होय.

खाली दिलेल्या पाच मुद्द्यांना अनुसरून रसग्रहण करावे.

(१) कवितेचा विषय आणि कवितेची मध्यवर्ती कल्पना.

(२) कवितेतील प्रतिमा, प्रतीके, अर्थालंकार, आंतरिक लय, अर्थाचे सौंदर्य.

(३) कवितेतून सूचित होणारे काव्यगुण, शब्दशक्ती, भाषाशैली–
(संवादात्मक/निवेदनात्मक/चित्रदर्शी असल्यास).

(४) कवितेतील शब्दालंकार, नाद, बाह्य लय, छंद, वृत्त इत्यादी.

(५) कवितेतून मिळणारा संदेश, मूल्ये आणि कविता आवडण्याचे कारण.

कवीला कवितेत काय सांगायचे आहे अन् त्याने ते कसे सांगितले आहे; याचे विद्यार्थ्यांनी स्वत:च्या संवेदनशील मनाने विचारपूर्वक केलेले विवेचन म्हणजेच 'रसग्रहण' करणे होय.